राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
" (सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)"
(विद्या विभाग)
छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५७०१

क्र. रातुमनावि/विद्या/१९/९०                                        दिनांक १४ जून , २०१९

# : अधिसूचना :

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, दिनांक १० जानेवारी,२०१९ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेने बाब क्रमांक ५६ नुसार ATKT च्या नियमात अध्यादेश क्रमांक १० प्रमाणे सुधारणा करण्याची आवश्यक कार्यवाही घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार सदर निर्णय दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ ते ३ मार्च,२०१९ रोजी संपन्न झालेल्या अभ्यासमंडळ/तदर्थ समितीसमोर सादर करण्यात आला होता. त्यानुसार अभ्यासमंडळांनी/तदर्थ समितीने ATKT च्या नियमाबाबत व परिक्षा समायोजनेबाबत कार्यवाही घेउन एम.ए. भाग १ व २(1 to 4 Semester) पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता नविन परिक्षा समायोजन योजना C.B.S. अभ्यासक्रमातील अनुत्तिर्ण विद्यार्थ्यांकरिता C.B.C.S. अभ्यासक्रमातील परिक्षा समायोजन योजना (Matcheble Scheme) तयार करून दिलेल्या होत्या. यास मा.कुलगुरू महोदयांनी मानवविज्ञान व आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेच्या वतिने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६च्या कलम १२(७)अंतर्गत मान्यंता प्रदान केली होती. तसेच चारही विद्याशाखेत ATKT व इतरही नियमात समानता राहण्याकरिता एकरूप निर्देश क्र. १०/२०१९ निर्गमित करण्यात आलेला आहे.

करिता उपरोक्त नुसार सदर बाब प्रारूप निदेश समितीकडे सादर केली होती. प्रारूप निदेश समितीने दिनाक ०३ मे,२०१९ रोजी निदेशात किरकोळ सुधारणा सूचवुन नविन प्रारूप निदेश मा.कुलगुरू महोदयांकडे सादर केले होते. यास मा.कुलगुरू महोदयांनी मान्यता प्रदान केलेली आहे. **निदेश क्रमांक ३१/२०१९ मानवविज्ञान व आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेअंतर्गत येणाऱ्या एम.ए. भाग १ व २(1 to 4 Semester) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सत्र पध्दतीकरिता सत्र २०१८–२०१९ पासुन पुढे कार्यान्वीत करण्यास मा.कुलगुरू महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत दिनाक १४ जून,२०१९ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे. करिता याप्रमाणे सर्व सबंधीतांनी कार्यवाही** ध्यावी ही विनंती.

(टिप:– उपरोक्त निदेश विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.)

मा.कुलगुरूंच्या आदेशानुसार

(डॉ. विनायक देशपांडे)
कुलसचिव(कार्यकारी)

**प्रतिलिपी माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:**

१. प्राचार्य, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नीत मानवविज्ञान विद्याशाखा व आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखे अंतर्गत येणार सर्व महाविद्यालय
२. मा.अधिष्ठाता, मानवविज्ञान व आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
३. मा.अध्यक्ष/सभासद अभ्यासमंडळ,मानवविज्ञान व आ.वि.अभ्यास विद्याशाखा
४. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ
५. उपकुलसचिव(परिक्षा पुर्व/परिक्षा उपरांत/ म.वि.वि.शाखा/सा.प्रशासन)
६. सहायक कुलसचिव( सामान्य परिक्षा/चौकशी/गोपनिय)
७. उपकुलसचिव मा. कुलगुरूंचे कार्यालय,
८. मा. प्र–कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक,
९. मा.कुलसचिवांचे स्वीय सहाय्यक,
१० डॉ. विणा प्रकाशे, माहितीशास्त्रज्ञ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर

(प्रदिप मसराम)
उपकुलसचिव(अ.प्र)(विद्या)

Notification 16-17(3)